# अर्थ प्रशासन विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जाक्र./अप्रवि/अंसेनियो/ 290 /२०१७ दिनांक: 12 /०६/२०१७

## परिपत्रक

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, चालु वित्तीय वर्षात नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील राजीनामा दिलेल्या, मृत्यु झालेल्या, अधिकारी/कर्मचारी यांची माहिती आवश्यक कागदपत्रासह तसेच आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडून डि.सी.पी.एस. च्यां विवरणपत्रकांवर साक्षांकित केलेल्या प्रतींसह आणि कृषि व पदुम शासन निर्णय कमांकः संकिर्ण–1514/प्र.क.117/6–अे दिनांकः 30/11/2015 नुसार मागितलेल्या आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये (नमुना अ,ब,क,ड) रितसर माहिती भरून या कार्यालयात सादर करणे गरजेचे आहे. परंतु अद्यापदेखील जवळपास सर्वच विभागाकडून विहीत नमुन्यातील अर्ज या कार्यालयास अप्राप्त आहे. करीता सदर प्रस्ताव विहीत नमुन्यात या कार्यालयास सादर करावे तसेच चालु वित्तीय वर्षात नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील सेवानिवृत्त होणा–या अधिकारी/कर्मचारी यांची देखील माहिती संबंधित कागदपत्रासह (D.C.P.S. Schedule) या कार्यालयास सादर करावी. अन्यथा संबंधित प्रकरणी संपुर्ण जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहिल.

या कार्यालयाच्या असेही निदर्शनास आले आहे की, नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेमधील अधिकारी/कर्मचा–यांच्या संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधितांचे नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे खाते उघडण्याकरीता अजुनही विहित नमुन्यातील प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेले नाहीत. संबंधित बाबतचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक असते. सदर प्रकरणी झालेल्या विलंबास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार राहतील.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलिपि:

१) मा. कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना माहितीस्तव सादर.